# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक २७ जून, २०१९

## ( सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत )

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(बुधवार, दिनांक १९ जून, २०१९ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतू पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना)**

(१) **सर्वश्री. मंगलप्रभात लोढा, सुनिल प्रभू, अबू आजमी, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"प्लास्टिक कचऱ्याची पध्दतशीरपणे विल्हेवाट लावण्यासंबंधी कृती योजना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (सीपीसीबी) सादर न केल्यामुळे महाराष्ट्रासह २१ राज्य सरकारांना राष्ट्रीय हरीत लवादाने प्रत्येकी दरमहा एक कोटी रुपये दंड भरण्याचे दिनांक २६ मे, २०१९ रोजी दिलेले आदेश, राज्यात प्लास्टिक आणि घनकचरा व्यवस्थापनाची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असणे, राज्यात प्लास्टिक पिशवी बंदीचा निर्णय घेऊनही त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे, प्लास्टिक पिशवी नष्ट करणेबाबत अद्यापही राज्य व महानगरपालिकेकडून पुरेशा प्रमाणात उपाय योजना करण्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, राज्यात प्लास्टिक आणि घनकचरा व्यवस्थापनाची स्थिती गंभीर असूनही राज्य शासन आणि महानगरपालिकेकडून या महत्वाच्या विषयाला प्राथमिकता न दिल्यामुळे सदर समस्येमध्ये झालेली चिंताजनक वाढ केंद्रीय सीपीसीबी मंडळाने दिनांक ३० एप्रिलपर्यंत कृती योजना सादर करण्याची मुदत देऊनही त्याचे पालन न करणे, एकंदरीत प्लास्टिक आणि घनकचऱ्याची विल्हेवाट लावणे संबंधी कृती योजना तयार करणेबाबत शासन गंभीर नसल्याची बाब निदर्शनास येणे, यामुळे राज्यातील प्रदूषणात वाढ होऊन पर्यावरणाचा झालेला प्रचंड ऱ्हास, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(गुरुवार, दिनांक २० जुन, २०१९ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतू राखून ठेवण्यात आलेली लक्षवेधी सूचना)**

(२) **सर्वश्री. छगन भुजबळ, अजित पवार, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे पिंपरी सैय्यद (ता.जि.नाशिक) येथे कृषी टर्मिनल मार्केट उभारण्यासाठी निश्चित केलेली जागा महाराष्ट्र कृषी पणन महामंडळाला हस्तांतरीत करण्यासाठी ग्रामविकास तसेच नगरविकास व महसूल आणि वन विभागाने सहमती दर्शवूनही माहे मे, २०१९ पर्यंत सदर जागा कृषी पणन महामंडळास उपलब्ध करून दिलेली नसणे, नाशिक टर्मिनल मार्केटसाठी निश्चित केलेल्या जागेची सहसंचालक (पणन) यांचे अध्यक्षतेखालील समितीने पाहणी करुन शासनास अहवाल सादर केलेला असणे, सदर टर्मिनल मार्केट विकसित करण्यासाठी खाजगी भागीदारीकरिता बिजनेस मॉडेल तयार करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल कृषी पणन मंडळाने शासनास सादर केलेला असणे, नाशिक हा कृषीप्रधान जिल्हा असल्यामुळे येथे भाजीपाला,फळे व अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन घेतले जात असणे, शेतकऱ्यांच्या कृषी मालाला चांगली बाजारपेठ मिळावी यासाठी नाशिक येथे अद्ययावत टर्मिनल मार्केट उभारण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिलेली असणे, सदर टर्मिनल मार्केटच्या उभारणीसाठी मौजे पिंपरी सैय्यद (ता.जि.नाशिक) येथील शासन मालकीची १०० एकर जमीन टर्मिनल मार्केटची नोडल एजन्सी असलेल्या महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाला विनामुल्य उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित असणे,जिल्हा प्रशासनाने प्रस्तावित केलेली जागा टर्मिनल मार्केटसाठी हस्तांतरीत करून या मार्केटच्या उभारणीसाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, मात्र शासनाकडून याबाबत कोणतीही कार्यवाही न केली जाणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बुलढाणा शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजने अंतर्गत शहरात केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्यामध्ये नारूचे जंतू आढळून येणे, मागील अनेक दिवसांपासून शहरात स्वच्छता अभियान राबविले न जाणे, नगर परिषदेच्या आस्थापनेवर १२५ सफाई कामगार असतानासुद्धा शहर स्वच्छतेचा ठेका खाजगी कंपनीस देणे, खाजगी कंत्राटदारांनी नियुक्त केलेल्या ६५ सफाई कामगार व वाहनचालकांचे मागील दोन महिन्यापासून वेतन अद्याप अदा न करणे, परिणामी या कंत्राटी सफाई कामगारांनी मुख्याधिकारी, न.पा. यांच्या घरासमोर आंदोलन करणे, शहरातील मुख्य रस्त्यावरील पथदिवे दीड वर्षापासून बंद असणे, शहरात रस्त्यांची झालेली दुरवस्था, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त निधी मध्ये झालेली अनियमितता, दिव्यांगासाठी प्राप्त होणारे अनुदान पूर्णत: वाटप न करणे, एलईडी लाईट घोटाळा, अनियमित होणारा पाणीपुरवठा, नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे पिण्यास अयोग्य, दूषित व घाण पाणी नागरिकांना पुरविण्यात येणे, याबाबत दिनांक ३ जून, २०१९ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक व नागरिकांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे केलेली तक्रार, शहरातील अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनाचा रखडलेला प्रश्न, मागील दहा-बारा वर्षापासून बुलढाणा

शहरात सुरू असलेल्या नाट्यगृहाच्या बांधकामासाठी प्राप्त निधी इतर कामावर खर्च करणे, वारंवार मागणी करून देखील नाट्यगृहाच्या बांधकामासाठी शासनाने निधी उपलब्ध करून न देणे, पावसाळ्यापूर्वी खबरदारीचा उपाय म्हणून नालेसफाई, शहर स्वच्छता न होणे, बुलढाणा शहरातील कर भरणा करणाऱ्या ९७ टक्के नागरिकांच्या आरोग्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, बुलढाणा नगरपरिषदेच्या गलथान कारभाराची सखोल चौकशी करून कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. राहुल मोटे, संदीप नाईक, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, वैभव पिचड, पांडुरंग बरोरा, राहुल जगताप, दत्तात्रय भरणे, राणाजगजीतसिंह पाटील, दिपक चव्हाण, ,डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. पंकज भुजबळ, नरहरी झिरवाळ, सुरेश लाड, विजय भांबळे, संजय कदम, बाळासाहेब पाटील, मकरंद जाधव-पाटील, भाऊसाहेब पाटील – चिकटगांवकर, डॉ मधुसूदन केंद्रे, सर्वश्री बबनराव शिंदे, दिलीप सोपल, शिवेंद्रसिंह भोसले, मनोहर नाईक, संग्राम जगताप, सर्वश्रीमती सुमन पाटील, ज्योती कलानी, सर्वश्री.अवधूत तटकरे, प्रदीप जाधव-नाईक, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री कृष्णा गजबे, राजेश काशीवार, डॉ. देवराव होळी, श्री. संजय पुराम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात तेंदुपत्ता संकलनाचे ३०० युनिट असून त्यापैकी २०४ युनिटची विक्री झाली असून विदर्भातील यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, अकोला, पुसद, पांढरकवडा, ब्रम्हपुरी, चंद्रपूर, नागपूर, वर्धा व मराठवाडयातील बीड, औरंगाबाद, नांदेड व जळगांव येथील युनिटमध्ये तेंदूपत्ता खरेदीकरिता बोली न लागल्यामुळे तेथील तेंदुपत्ता संकलन करणारे सुमारे १ लाख तेंदूमजूर बेरोजगार झाले असून त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची परिस्थिती निर्माण झाल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, सन २०१५-१६ व २०१७ मध्ये राज्यात तेंदुपत्त्याचे मोठया प्रमाणात उत्पादन झाले असून त्याला चांगले दर देखील मिळालेले असणे, परंतु यावर्षी तेंदुपत्त्यावर शासनाने २८ टक्के जीएसटी कर लावल्यामुळे तेंदुपत्ता खरेदी करणारे व्यापारी राज्यात न आल्यामुळे या मजूरांवर बेकारीचे संकट ओढविणे, तेंदुपत्ता मजूरांची बेकारी दूर करण्यासाठी शासनाने उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राधानगरी (जि.कोल्हापूर) अभयारण्याची निर्मिती महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १६ सप्टेंबर, १९८५ रोजीच्या अधिसूचनेनुसार करण्यात येणे, अभयारण्याच्या एकूण ३१५.१६

चौ.कि.मी. अधिसूचित क्षेत्रामध्ये राधानगरी तालुक्यातील २९ महसुली गावे व गगनबावडा तालुक्यातील १ गावाचा समावेश असणे, अभयारण्यातील नागरिकांचे हक्क व सवलतींची चौकशी करण्याकरीता उपविभागीय अधिकारी यांची चौकशी अधिकारी पदी नेमणुक करण्यात येणे, उपविभागीय अधिकारी, राधानगरी यांनी राधानगरी तालुक्यातील १२ महसुली गावांतील २९ वाडया वस्त्यांचे व गगनबावडा तालुक्यातील २ अशा वाडया/वस्त्यावरील १४९९ खातेदारांचे पुनर्वसन करण्याची शिफारस करणे, यामध्ये प्रामुख्याने कारीवडे, डिगस, जुने व नविन करंजे, एजिवडे, शेळप, ओलवन, बांबर, हसणे यासह अन्य गावांचा समावेश असणे, पुनर्वसनासाठी संकलन व मुल्यांकन करण्याच्या वेळी १८ वर्षे पुर्ण झालेल्या व्यक्तीस पुनर्वसन पॅकेजचा लाभ देणे आवश्यक असणे, एजिवडे व न्यु करंजे येथील प्रकल्पग्रस्तांनी आपल्या जमिनी व घरे शासनाला दानपत्राद्वारे देऊन अदयापही त्यांच्या घरांच्या मुल्यांकनाची रक्कम न मिळणे, प्रकल्पग्रस्तांना पर्याय क्र.१ प्रमाणे १० लक्ष रुपयांची रक्कम वेळेत न मिळणे, न्यु करंजे व दाऊदवाडी (ता.राधानगरी) येथील पुनर्वसनासाठी पर्याय क्र.२ स्विकारलेल्या लाभार्थ्यांनी लक्ष्मी टेकडी कागल (जि.कोल्हापुर) येथील वनजमिन पसंत केली असुन ९९ हेक्टर जमिनीची मागणी करण्यात येणे, याबाबत वने मंत्री यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीमध्ये तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देऊनही वन विभागाकडून कोणतीही कार्यवाही न करणे, ज्या गावांना अभयारण्यामध्ये वास्तव्य करावयाचे आहे अशा गावातील नागरीकांना पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी वन विभाग अडवणुक करत असणे, यामुळे प्रकल्पग्रस्त व अभयारण्यामध्ये वास्तव्य करणाऱ्या नागरिकांमध्ये असंतोष पसरणे, विस्थापित होणा-या प्रकल्पग्रस्तांना १० लक्ष रुपये ऐवजी २५ लक्ष रुपये पॅकेज करण्याकरीता राज्य शासनाने केंद्र शासनास शिफारस करुनही अदयाप कोणतीही कार्यवाही न होणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन संकलन रजिस्टर दुरुस्ती १०० टक्के पुर्ण होत नाही तो पर्यंत कोणत्याही प्रकल्पग्रस्तांना विस्थापित न करणे यासह प्रकल्पग्रस्तांच्या अन्य मागण्यांबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) वित्त मंत्री** : मॅफको महामंडळाचा सन २०१७-२०१८ चा ४७ वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उद्योग मंत्री** : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन

२०१४-२०१५ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) ऊर्जा मंत्री** : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा तेरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) कामगार मंत्री** : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचा सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा "अठ्ठावन्नावा" अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : पंचायती राज समितीचा सव्वीसावा, सत्ताविसावा, अठ्ठाविसावा व एकोणतीसावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**पाच : औचित्याचे मुद्दे.**

**सहा : सन २०१९-२०२० च्या अतिरिक्त अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस)**

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग

(२) जलसंपदा विभाग

(३) ग्रामविकास विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**
**[चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०५.३० वाजता]**

**सात : शासकीय विधेयक :**

**पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ — महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१९

**आठ : सन २०१९-२०२० च्या पुरवणी मागण्या सादर करणे.**

**(बुधवार, दिनांक २६ जून, २०१९ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**नऊ : श्री सुनिल प्रभु, ॲड. राज पुरोहित, सर्वश्री अजय चौधरी, अतुल भातखळकर, सदा सरवणकर, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री सुनिल शिंदे, मंगलप्रभात लोढा, ॲड. गौतम चाबुकस्वार, सर्वश्री अमित साटम, संजय पोतनीस, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री प्रकाश महेता, प्रताप सरनाईक, राम कदम, संजय शिरसाट, कॅप्टन आर तामील सेल्वन, सर्वश्री मनोहर भोईर, सरदार तारासिंह, मंगेश कुडाळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, नरेंद्र मेहता, रमेश लटके, संजय केळकर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री नरेंद्र पवार, तुकाराम काते, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री सुभाष भोईर, प्रशांत ठाकूर, अशोक पाटील, पास्कल धनारे, सुरेश गोरे, किसन कथोरे, राजाभाऊ वाजे, योगेश घोलप, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात राज्य शासनाने पालघर जिल्हयातील पालघर व वसई संपूर्ण तालुके आणि रायगड जिल्हयातील अलिबाग, पेण, पनवेल व खालापूर संपूर्ण तालुके यांचा समावेश करुन प्राधिकरण क्षेत्राचा केलेला विस्तार, सदर निर्णयामुळे वसई-मिरा-भाईंदर दरम्यान नवीन खाडीपूल, विकास केंद्रे, वसई-विरार क्षेत्रासाठी सुर्या पाणी पुरवठा प्रकल्प, नैना प्रकल्पास चालना, ट्रॉन्स हार्बर रेल्वे अलिबाग पर्यंत इत्यादि विविध योजना कार्यान्वित होणार असणे, मुंबईतील महत्वाकांक्षी सागरी किनारा रस्त्याचा (कोस्टल रोड) प्रकल्प, मुंबईतील मिठी नदी स्वच्छ करण्याच्या योजनेंतर्गत शहरातील सांडपाणी प्रक्रिया करुन ते पाणी मिठी नदीत पुन्हा सोडण्याची योजना, केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी परियोजनेंतर्गत राज्यातील पुणे, ठाणे, नागपूर, औरंगाबाद, सोलापूर, नाशिक, पिंपरी-चिंचवड, कल्याण-डोंबिवली या ८ शहरासाठी राज्य शासनाला माहे फेब्रुवारी, २०१९ अखेर १५६८ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येणे, गृहनिर्माण धोरणास मान्यता देण्यास होत असलेला विलंब, मुंबईतील शिवडी, गोराई (बोरिवली), माहिम भागातील जैवविविधतेमुळे पानथळीने व्यापलेले क्षेत्र पर्यटन क्षेत्र म्हणून जाहिर करण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या सूचना, तथापि, जिल्हाधिकाऱ्यांनी कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे पानथळ क्षेत्रांवर दिवसेंदिवस वाढत जाणारी अनधिकृत बांधकामे, मुंबई शहर व उपनगरातील विकासक, मोठमोठया कंपन्या, मॉल्स यांनी महापालिकेचा सुमारे १३३.२५ कोटी रुपयांचा थकवलेला कर, मुंबईतील अपूर्ण असलेले एसआरए प्रकल्प पूर्ण करण्यासाठी उपाययोजना, म्हाडाच्या ५६

वसाहतींचा रखडलेला पुनर्विकास, मुंबईतील मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त व बिगर उपकरप्राप्त सुमारे १४०० इमारती, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या इमारत व पुनर्रचना मंडळाच्या व झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतंर्गत बांधलेल्या इमारतीची दुरुस्ती, बीपीटी व बीआयटीच्या जागेवरील धोकादायक इमारती, म्हाडाच्या इमारतींमध्ये ३०० पेक्षा जादा घुसखोर असल्याचे निष्पन्न होणे, राज्यात ६० लक्ष झाडे लावण्याचा शासनाची महत्वाकांक्षी योजना, वांद्रे-पूर्व येथील शासकीय अधिकारी-कर्मचारी यांना दिलेल्या निवासस्थानांच्या जागेवर मालकी हक्काने निवासस्थाने बांधून देण्याची मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

दहा : **सर्वश्री अजित पवार, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, मो. आरीफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, बसवराज पाटील, हसन मुश्रीफ, सुनील केदार, भास्कर जाधव, प्रा. वीरेंद्र जगताप, सर्वश्री संदीप नाईक, जयकुमार गोरे, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री गोपालदास अग्रवाल, सुरेश लाड, अमित देशमुख, ॲड॰ दिलीप सोपल, सर्वश्री डी.एस.अहिरे, राणाजगजीतसिंह पाटील, ॲड॰ यशोमती ठाकूर, सर्वश्री बबनराव शिंदे, विश्वजीत कदम, राजेश टोपे, मधुकरराव चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, डि॰ पी. सावंत, राहुल मोटे, वसंतराव चव्हाण, शिवेंद्रसिंह भोसले, अमीन पटेल, दत्तात्रय भरणे, ॲड॰ के.सी.पाडवी, सर्वश्री बाळासाहेब पाटील, सिध्दाराम म्हेत्रे, संजय कदम, कुणाल पाटील, दिपक चव्हाण, काशिराम पावरा, श्रीमती दीपिका चव्हाण, सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, पंकज भुजबळ, राहुल बोंद्रे, प्रदीप जाधव-नाईक, अमर काळे, विजय भांबळे, सुभाष उर्फ पंडीतशेठ पाटील, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री वैभव पिचड, पांडुरंग बरोरा, अमित झनक, नरहरी झिरवाळ, रणजित कांबळे, अवधुत तटकरे, श्रीमती अमिता चव्हाण, श्री राहुल जगताप, डॉ.संतोष टारफे, श्री शेख आसिफ शेख रशीद, डॉ. मधुसूदन केंद्रे, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अस्लम शेख, सर्वश्रीमती सुमन पाटील, संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबकराव भिसे, भारत भालके, कालिदास कोळंबकर, नितेश राणे वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"गेल्या पावणेपाच वर्षात विविध विभागामध्ये उघडकीस आलेल्या घोटाळयांची व गैरव्यवहारांची शासनाकडून गांभिर्याने दखल घेतली न जाणे, शासनाच्या विद्यमान मंत्री व राज्यमंत्र्यांनी गैरव्यवहार केल्याची प्रकरणे उघडकीस येणे, तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांनी झोपडपट्टी पुर्नविकास योजनेत सुमारे ५०० कोटी रुपयांचा केलेला गैरव्यवहार, तत्कालीन सामाजिक न्याय विभागाच्या राज्यमंत्र्यांविरुध्द दारु दुकानाचा परवाना मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवून १ कोटी ९२ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मा.न्यायालयाच्या आदेशाने त्यांचेविरुध्द गुन्हा नोंदविण्यात येणे, उर्जा राज्यमंत्री यांनी यवतमाळ शहरातील सुमारे ११ कोटी रुपये किंमतीचा भूखंड बनावट कागदपत्रे तयार करुन त्यावर बँकामधून

कोटयवधी रुपये कर्ज घेऊन भ्रष्टाचार केल्याप्रकरणी त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे मा.न्यायालयाने दिलेले आदेश, शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडून भ्रमणध्वनी (मोबाईल) खरेदीमध्ये १०६ कोटी रुपयाचा झालेला भ्रष्टाचार उघडकीस येणे, जलसंपदा मंत्र्यांनी मानापूर येथील महार वतनाची जमिन जबरदस्तीने घेतल्याचा होत असलेला आरोप, महिला व बालविकास विभागात पुरक पोषण आहार योजनेचे कंत्राट देताना त्यात ७५० कोटी रुपयाचा करण्यात आलेला गैरव्यवहार, मुंबईतील गोरेगाव येथील आरे वसाहतीत आदिवासींना सोयीसुविधा देण्याच्या नावाखाली व्यायामशाळेचे बांधकाम केल्याचे उघडकीस येणे, एका मंत्र्याच्या मेव्हणे व अन्य नातेवाईक संचालक असलेल्या व्हिकोटोरिया फुड प्रोसेसिंग कंपनीवर थकीत कर्ज प्रकरणी झालेले गंभीर आरोप, जेएसडब्ल्यु इस्पात लिमिटेड या कंपनीला ५९२ कोटी रुपयाचे वीज शुल्क माफी देण्याच्या प्रकरणात करण्यात आलेला गैरव्यवहार, जलयुक्त शिवार योजनेतील वेगवेगळया कामांमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली असताना मा.मंत्री (जलसंधारण) यांनी विधानपरिषद सभागृहात भ्रष्टाचार झाल्याचे मान्य केलेले असणे, याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खुल्या चौकशीची मागणी केल्यानंतरही ती दबावामुळे फेटाळली जाणे, शिक्षण विभागातील अग्निशमन यंत्र घोटाळयातील चौकशी अहवाल गायब झाल्याची बाब उघडकीस येणे, याच विभागातील राष्ट्रपुरुषांच्या तस्वीरी व अर्ली रिडल बुक खरेदी प्रकरणात केंद्र शासनाने दोषी ठरवून देखील त्यांच्या विरुध्द शासनाने कोणतीही कारवाई न करणे, सार्वजनिक आरोग्य विभागातील औषधी खरेदीत करण्यात आलेला घोटाळा, आदिवासी विभागाने साहित्य खरेदीत केलेला गैरव्यवहार, पणन विभागातील तूरडाळ भरडाईत झालेला घोटाळा, पर्यटन महामंडळाने तोरणमाळ येथील जमिन हडप करण्याचे प्रकरण इत्यादी प्रकरणात चौकशी करण्याची घोषणा होऊन देखील अहवाल सादर करण्यात दिरंगाई झालेली असणे, सोलापूर येथील सार्वजनिक भूखंडावर आरक्षण असतांना बेकायदेशीर बंगला बांधल्याप्रकरणी चौकशी होऊन चौकशीत गंभीर दोष आढळून आल्यानंतरही दोषीविरुध्द अद्याप कोणतीही कारवाई करण्यात न येणे, सारंगखेडा चेतक महोत्सवाचे बेकायदेशीर कंत्राट दिल्याची बाब उघडकीस येणे, राज्याच्या पोलीस दलात भ्रष्टाचार मोठया प्रमाणावर वाढला असून मुंबईत एका दिवसात ३ वरिष्ठ पोलीस अधिकारी लाच घेताना पकडले जाणे, ठाणे परिक्षेत्रात सन २०१९ मध्ये पाच महिन्याच्या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २४ कारवाया केलेल्या असणे, विदर्भातील समन्वयीन कृषी विकास प्रकल्पामध्ये सन २०१८-१९ मध्ये अवघ्या सात महिन्यात १०३ कोटी ५० लक्ष रुपयाच्या अनुदानामध्ये अपहार झालेला असणे, या रक्कमेचा अपहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना पणन मंत्र्यांनी पाठीशी घातलेले असणे, वरिष्ठ पातळीवरील भ्रष्टाचार प्रकरणांना शासन पाठीशी घालत असल्याचा संदेश जात असल्यामुळे शासकीय यंत्रणामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु असणे, राज्यकर्तेच गैरव्यवहार करीत असल्यामुळे शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यात सुध्दा आर्थिक गैरव्यवहार करण्यास मिळत असलेले बळ, आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार करणाऱ्याविरुध्द कारवाई करण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे जनमानसात शासनाविरुध्द निर्माण झालेला असंतोष तसेच नुकतेच राज्यात लोकसभेच्या निवडणुका पार पडलेल्या असणे, राज्यातील अनेक ठिकाणी मतदार

यादयांमध्ये घोळ झाल्याचे आढळून येणे, मतदारनोंदणी करताना भरण्यात आलेले फॉर्म चुकीच्या पध्दतीने भरल्यामुळे किंवा काही नावे चुकीची लिहिली गेल्यामुळे मतदार यादीत मतदारांची नावे न येणे, १० वर्षापूर्वी मतदार यादीत नाव नोंदणी केलेल्या मतदारांकडे पुरावा नसल्यामुळे किंवा वयामुळे फोटोत फरक होत नसल्यामुळे मतदारांना मतदानाचा हक्क बजावता न येणे, काही ठिकाणी मतदारांकडे निवडणुक ओळखपत्र असताना सुध्दा त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट नसणे, राज्यातील झोपडपट्टीत राहणाऱ्या अल्पसंख्यांक व मागासवर्गीय समाजातील मतदारांना मतदान करण्यासाठीच्या पावत्या नसल्यामुळे समुदाय मतदानापासून वंचित राहिलेला असणे, त्यामुळे मतदानाची टक्केवारी कमी होणे, निवडणुकीचे काम करण्यास शिक्षकांनी नकार दिल्यामुळे मतदार यादया तयार करण्यास निर्माण झालेल्या अडचणी, आधारकार्ड योग्य पुरावा असल्याचे गृहीत धरुन मतदार यादया बनविण्याचे काम केल्यास मनुष्यबळ व वेळ वाचणार असल्यामुळे या कामासाठी आधारकार्ड पुरावा म्हणून वापरण्याची आवश्यकता, निवडणुकीमध्ये ईव्हीएमव्दारा मतदान पध्दतीबाबत राजकीय पक्ष व जनतेमध्ये संशयाचे वातावरण असून ईव्हीएम मशीनव्दारे झालेले मतदान व मतमोजणी यामध्ये तफावत असल्याचे उघड झाले असणे तसेच भविष्यात बॅलेट पेपर पध्दतीने मतदान घेण्यात यावे, अशी अनेक लोकप्रतिनिधी व जनतेची एकत्रित मागणी असणे, बॅलेट पेपरचा उपयोग कर्नाटक व इतर राज्यात करण्यात येणे, त्याला मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळणे, हीच पध्दत राज्यात सुरु करण्याबाबत व निवडणुक प्रक्रिया सुटसुटीत करुन मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी शासनाने याप्रकरणी केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

**अकरा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ — भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१९

(२) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१९

(३) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ — महाराष्ट्र करविषयक कायदे (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१९

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार,

जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, पृथ्वीराज चव्हाण, अबू आजमी, अस्लम शेख, कुणाल पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, बसवराज पाटील, त्र्यंबकराव भिसे, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, संग्राम थोपटे, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, त्र्यंबकराव भिसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, अबू आजमी, अस्लम शेख, कुणाल पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, बसवराज पाटील, त्र्यंबकराव भिसे, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणो) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राहूल बोंद्रे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था

(दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश टोपे, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. भारत भालके, शेख आसिफ शेख रशीद, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री. अमित झनक, हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) (सुधारणा) विधेयक, २०१९

---

**(ड) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, पृथ्वीराज चव्हाण, अबू आजमी, अस्लम शेख, कुणाल पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, बसवराज पाटील, त्र्यंबकराव भिसे, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ – महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०१९**

---

**(२)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, अमिन पटेल, डी.पी.सावंत, श्रीमती निर्मला गावीत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री वसंतराव चव्हाण, कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स.**

**यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री अमित झनक, हर्षवर्धन सपकाळ, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, अमिन पटेल, कुणाल पाटील, शेख आसिफ शेख रशीद, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४)** (क) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, संग्राम थोपटे, सुनिल केदार, अमर काळे, अमिन पटेल, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री. अमित झनक, डी.एस.अहिरे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री.अमित झनक, राहूल बोंद्रे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(५)** (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, संग्राम थोपटे, सुनिल केदार, अमर काळे, अमिन पटेल, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री. अमित झनक, डी.एस.अहिरे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा

अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री.अमित झनक, राहूल बोंद्रे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(इ) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-**

**सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८.**

---

**(फ) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, पृथ्वीराज चव्हाण, अबू आजमी, कुणाल पाटील, अस्लम शेख, बसवराज पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, त्र्यंबकराव भिसे, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ – महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, अमिन पटेल, संग्राम थोपटे, राहुल बोंद्रे, शेख आसिफ शेख रशीद, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश टोपे, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. हर्षवर्धन सकपाळ, अमिन झनक, प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ज) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-**

**सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

---

**बारा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक २० जून, २०१९ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्र. १ व २)**

**(१) श्री. अमीन पटेल, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई शहरातील ६१९ इमारती अतिधोकादायक स्थितीत असल्याचे उघडकीस येणे, या इमारतीच्या दुरुस्तीसाठी व पुनर्विकासासाठी संबधित म्हाडा प्रशासन व महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असून या इमारती रिकाम्या करण्याची कार्यवाही करण्यात न आल्याने शेकडो रहिवाश्यांचा जीव धोक्यात असणे, यंदाच्या पावसाळयात या अतिधोकादायक इमारती कोसळून मोठी जीवीत हानी होण्याची शक्यता असणे, त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये म्हाडा प्रशासन व मुंबई महानगरपालिकेबाबत पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन या अतिधोकादायक ६१९ इमारतीच्या पुनर्विकासासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई शहरास केंद्र शासनाने नुकतेच स्मार्ट सिटी म्हणून घोषित केलेले असणे, स्मार्ट सिटी अंतर्गत देण्यात येत असलेल्या सेवा सुविधांमध्ये समाविष्ट असलेल्या बेस्ट उपक्रमावर गत १५ वर्षापासून २७६६.७० कोटी रुपये इतके कर्ज झालेले असणे, सदर कर्जाचे नियोजन वेळेत न झाल्यास लाखो लोकांना सेवा उपलब्ध करुन देणारा व मुंबईची जीवनवाहिनी म्हणून ओळख असलेला बेस्ट उपक्रम बंद होवून ४६ हजार कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांवर बेकारीचे संकट निर्माण होण्याचा धोका, सदर गंभीर समस्या तातडीने सोडविण्यासाठी शासनाने दिल्ली व कर्नाटक राज्याच्या धर्तीवर आर्थिक सहाय्य निधी देवून तोटयातील बेस्ट उपक्रमास नवसंजीवनी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक २५ जून, २०१९ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. ३ व ४)**

(३) **श्री. संदिप नाईक, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई-पुणे व मुंबई-गोवा या दोन महामार्गावरील वाहतूक नवी मुंबईतून जात असल्याने शहराला भेडसावत असलेली वायू प्रदूषणाची समस्या, ठाणे-बेलापूर औदयोगिक वसाहतीमधील कारखान्यातून दररोज रसायन मिश्रीत दूषित पाणी रात्रीच्या वेळी घणसोली, कोपरखैरणे, पावणे, तुर्भे, जुईनगर, नेरूळ येथील नाल्यांमध्ये सोडण्यात येत असल्यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरून तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, अनेकांना दम लागणे, डोळे चुरचुरणे, घशाचे व त्वचेचे जडलेले विकार, रासायनिक दूषित पाण्याबरोबरच कारखान्यातून प्रचंड प्रमाणात धूर सोडण्यात येत असल्याने त्याचाही परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असणे, घरांच्या छतावर आणि झाडांच्या पानावर कार्बनचे साचलेले थर, रसायन मिश्रीत दूषित पाण्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करणे नियमानुसार बंधनकारक असताना कारखाना व्यवस्थापनाकडून नियमांची होत असलेली पायमल्ली, सदर नाल्यांची व पावणे येथील सिईटिपीची स्थानिक लोकप्रतिनिधीनी केलेली पाहणी, घणसोली व कोपरी येथील नाल्यात दूषित लाल रंगाचे पाणी व कंपन्यांच्या चिमण्यांमधून बाहेर पडणाऱ्या रासायनिक वायू पसरत असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत नागरिकांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी करूनही प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून होत असलेली टाळाटाळ, नागरिकांच्या जीवनाशी खेळणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याची नागरिकांची होत असलेली मागणी, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मंत्री महोदयांना दिलेले निवेदन, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या या ढिसाळ कारभाराबाबत नागरिकांनी तीव्र आंदोलन छेडण्याचा घेतलेला निर्णय, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. नरेंद्र पवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"कल्याण डोंबिवली महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न अनेक वर्षांपासून उग्र होत असणे, पालिका क्षेत्रातून सुमारे ५५० मेट्रिक टन कचरा संकलित करून आधारवाडी डम्पिंग ग्राउंड येथे टाकला जात असणे, येथील डम्पिंग ग्राउंडची घनकचरा सामावून घेण्याची क्षमता संपुष्टात आली असून याबाबत पालिकेने तातडीने निर्णय घेवून सदरचे डम्पिंग ग्राउंड शास्त्रयुक्त पद्धतीने बंद करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेच्या सुनावणी दरम्यान सुमारे २ वर्षापूर्वी देणे, मात्र वेळकाढू धोरणामुळे पालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाअभावी नागरिकांच्या आरोग्याला हानी पोहचत असणे, पालिका क्षेत्राचे संकलन, वाहतूक आणि विल्हेवाट याबाबत राज्य

शासनाने सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत तब्बल ४४ कोटी विशेष अनुदान देण्याचे मान्य केले असून या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी पालिकेला अर्धा हिस्सा भरावा लागणे, पालिकेने कचरा संकलन आणि वाहतुकीसाठी सुमारे तब्बल १७ कोटी खर्च करून १२५ वाहने खरेदी करणे, त्याचबरोबर कल्याण पश्चिम विभागातील उंबर्डे गावातील सुमारे १० हेक्टर क्षेत्रात उर्वरित २७ कोटी खर्च करून विघटन प्रकल्प राबविण्याचे निश्चित केलेले असणे, उंबर्डे येथील प्रकल्पाबाबत ठाम भूमिका न घेतल्यामुळे पालिकेच्या हाती असलेले सुमारे २७ कोटींचे अनुदान वाया गेले यानंतर महापालिका प्रशासनाने पुन्हा उंबर्डे येथे प्रकल्प राबविण्यासाठी सुमारे ६० कोटी रुपयांचा प्रारूप विकास आराखडा बनवून विशेष सर्वसाधारण सभेची मंजुरी घेवून तो शासनाकडे अनुदानासाठी पाठविला असणे, सदर प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी शासनाने अनुदान देण्याची आवश्यकता."

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : २६ जून, २०१९

**जितेंद्र भोळे**
सचिव (का.)
महाराष्ट्र विधानसभा